## प्रकरण पाचवे

## "स्त्रियांचे बाबतीतील आर्थिक अधिकार."

"यदि कुर्यात्समानंशान् पत्न्यः कार्याः समांशिकाः।
न दत्तं स्त्रीधनं यासां भर्त्रा वा श्वशुरेण वा ।।"
{या.स्मृ.2.8.115}

"अप्रजस्त्रीधनं भर्तृर्ब्राह्मादिषु चतुर्ष्वपि ।
दुहितृणां प्रसूता चेच्छेषेषु पितृगामी तत् ।"
{या.स्मृ.2.8.145}

## प्रकरण पाचवे

## स्त्रियांचे बाबतीतील आर्थिक अधिकार

**प्रस्तावना :-**

याज्ञवल्क्याने दायविभाग प्रकरणामध्ये स्त्रीधन, पत्नी, कन्या यांना प्राप्त होणारे धनाचे अधिकार या आर्थिक अधिकारांबाबत महत्त्वपूर्ण विचार मांडले आहेत. "स्वातन्त्र्यं न क्वचित् स्त्रियाः" इ. नियमामुळे या स्मृतीने स्त्रीवर अन्याय केला आहे, असा विचार मनामध्ये दृढ झालेल्यांचा याज्ञवल्क्याने जी स्त्रियांच्या आर्थिक अधिकाराची चर्चा केली आहे, ती जाणून घेतल्यानंतर गैरसमज दूर होण्यास निश्चितच मदत होईल.

**व्याख्या : दायविभाग :-**

दायविभाग ह्या व्यवहारपदामध्ये "वाटप आणि वारसा" या दोन प्रमुख विषयांचे विवेचन केले जाते. ह्या विषयासंबंधी अतिशय भिन्न मते असणा-या दोन परंपरा अस्तित्वात असल्याचे दिसते. त्यांना त्या-त्या परंपरेमधील मिताक्षरा आणि दायभाग ह्या प्रमुख ग्रंथावरून "मिताक्षरा परंपरा" आणि "दायभाग परंपरा" अशा संज्ञा देण्यात आल्या आहेत. दायभाग परंपरेचे आधिक्य बंगालमध्ये विशेषत्वाने आढळते. बंगाल व्यतिरिक्त सर्व भारतात मिताक्षरा-परंपरा प्रमाण मानण्यात येते. मिताक्षरा परंपरेचे चार पोटविभाग आहेत. त्यामध्ये विज्ञानेश्वराने याज्ञवल्क्यस्मृतीवर लिहिलेली मिताक्षरा टीका हा ग्रंथ प्रमुख आधार आहे आणि काही बाबतीत भिन्न असणारे परंतु पूरक असणारे असे पुढील ग्रंथ आढळतात. वाराणसी परंपरा (वीर-मित्रोदय), मिथिला परंपरा (विवादरत्नाकर, विवादचंद्र आणि विवादचिंतामणी) महाराष्ट्र अथवा मुंबई परंपरा (व्यवहारामयूख) द्रविड अथवा मद्रास परंपरा (स्मृतिचंद्रिका), पराशरमाधवीय आणि सरस्वतीविलास.

BARR. B... ...EKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

दाय आणि विभाग शब्दांच्या निरनिराळ्या व्याख्या करण्यात आल्या आहेत· "जी संपत्ती एकाच्या मालकीची असून, त्या मालकाशी नाते आहे· एवढयाच कारणाने ती दुस-याच्या मालकीची होते, ती "दाय" अशी व्याख्या मिताक्षरेमध्ये दायविभाग प्रकरणाच्या प्रारंभीच दिली आहे·

नारदाने "ज्या व्यवहारपदात पुत्रांनी आपल्या पित्याच्या संपत्तीचे वाटप केल्याचा संबंध असतो, त्याला दायभाग म्हणावे" असे म्हटले आहे·

सरस्वतीविलासग्रंथात दायाची व्याख्या[1] पुढीलप्रमाणे केली आहे- "वडिलांकडून पुत्रांना दिले जाणारे जे स्वतःच्या मालकीचे धन, त्याला दाय म्हणतात·" ज्या संपत्तीचे वाटप करावयाचे असते, आणि जी एकदा विभक्त होऊन पुन्हा एकत्र झालेल्या भागीदारांच्या मालकीची होत नाही, अशी संपत्ती ती दाय·" असे व्यवहारमयूखात म्हटले आहे·

मिताक्षरापरंपरेतील मिताक्षरा, व्यवहारमयूख इ·ग्रंथांनी दायाचे "अप्रतिबंध" आणि "सप्रतिबंध" असे दोन प्रकार सांगितले आहेत· "ज्या प्रकारच्या दायात पिता अथवा पितामह जिवंत असले तरी त्यांच्या स्वाधीन असलेल्या संपत्तीत पुत्र अथवा पौत्र यांना केवळ ते त्या कुळात जन्मले एवढयाच कारणाने हितसंबंध उत्पन्न होण्यास प्रतिबंध होत नाही तो अप्रतिबंध दाय· जेव्हा एखाद्या मनुष्याला त्याच्या चुलत्याची अथवा स्वतःच्या पुत्राची संपत्ती तो चुलता अथवा पुत्र, संततीहीन मरण पावल्यामुळे मिळते, तेव्हा त्या संपत्तीला सप्रतिबंध दाय" असे म्हटले आहे· याचे कारण जोपर्यंत तो चुलता अथवा पुत्र जिवंत होता तोपर्यंत अथवा त्या चुलत्याला अथवा पुत्राला एखादा पुत्र अथवा पौत्र असेल तोपर्यंत त्या चुलत्याच्या अथवा पुत्राच्या संपत्तीत कोणत्याही प्रकारचा अधिकार नसतो·

"दाय" ह्या शब्दाच्या व्याख्येत "स्वत्त्व" म्हणजे मालकी या कल्पनेचा अंतर्भाव होतो· एखाद्या मनुष्याला एखाद्या वस्तूवरील स्वत्त्व ज्या प्रकारांनी प्राप्त होते, त्यात रिक्थ म्हणजे वारसा ह्या प्रकाराचा समावेश होतो·

विभाग याचा अर्थ वाटप· मिताक्षरेच्या मतानुसार पुत्रांना जन्मतः वडिलार्जित मिळकतीत हितसंबंध प्राप्त होतो· मिताक्षरेने विभागाची व्याख्या अशी केली आहे- "ज्या संपत्तीवर अनेक व्यक्तींची समाईक मालकी असते अशा संपत्तीचे निश्चित तुकडे करून ते त्या व्यक्तींना देणे त्याला विभाग म्हणतात·"

"विभागं चेत्पिता कुर्यादिच्छया विभजेत्सुतान्।
ज्येष्ठं वा श्रेष्ठभागेन सर्वे वा स्युः समांशिनः।।"[2]

जेव्हा पिता विभाग करण्याची इच्छा करतो· तेव्हा तो पुत्रांना आपल्या इच्छेप्रमाणे विभाग देऊन आपल्यापासून दूर करतो· ज्येष्ठाला श्रेष्ठ भाग किंवा सर्वांना सारखा भाग देतो· याप्रमाणे पित्याच्या इच्छेनुसार सम किंवा विषम विभाग सांगितला आहे· त्यापैकी समभागाविषयी महत्त्वाची बाब सांगितली आहे·-

**स्त्रीला दाय :-**

"यदि कुर्यात्समानंशान् पत्न्यः कार्याः समांशिकाः।
न दत्तं स्त्रीधन यासां भर्त्रा वा श्वशुरेण वा।।"[3]

जेव्हा पिता स्वतःच्या इच्छेने पुत्रांस धनाचा समविभाग देतो, तेव्हा स्त्रियांना पती किंवा श्वशुराने स्त्रीधन दिलेले नसते, अशा त्याने भार्यांनाही पुत्रासारखाच म्हणजे पुत्रांइतकाच भाग द्यावा·

अपरार्क टीकेत यानंतर असे म्हटले आहे- "एकस्य पुत्रस्य यावानंशः तावदंशम् एकैकां पत्नीम् कुर्यात् इति अर्थः।"

मिताक्षरासारात म्हटले आहे- "स्त्रीधन दिले असल्यास अर्धांश द्यावा· असे पुढे सांगतील, पण जेव्हा श्रेष्ठ भागादिकांच्या योगाने जेष्ठादिकास विभक्त करतो, तेव्हा भार्यांना श्रेष्ठादि भाग मिळत नाही, तर श्रेष्ठादि भागांचे वीस, दहा, पाच इ·धन काढून घेतल्यावर बाकीचे जे धन राहील, त्यातून सम विभाग मिळतो व आपआपला काढून ठेवलेला भागही मिळतो· घरातील परीभांड व अलंकार हा भार्येचा काढून ठेवलेला अंश आहे·"

याज्ञवल्क्यस्मृतीच्या वरील नियमावरून आपल्याला असे दिसते की, पत्नीला आपणहून वाटप मागता येत नाही· परंतु पतीने आपल्या ह्यातीत पुत्रांना आपल्यापासून वेगळे केले तर पत्नीला पुत्राच्याइतका हिस्सा मिळण्याचा हक्क असतो· एकीहून अधिक पत्नी असतील तर प्रत्येकीला पुत्राच्या समान हिस्सा मिळतो· मात्र पतीने अथवा सास-याने दिलेले स्त्रीधन अशा पत्नीच्या ताब्यात असेल तर त्या स्त्रीधनात जितकी भर घालून ते पुत्राच्या हिश्याइतके होईल, तितकीच मिळकत या पत्नीला देण्यात येते·

संपत्तीची वाटणी करताना पत्नीलाही वाटा दिला आहे. कदाचित आपल्या पश्चात मुलांनी विचारले नाही तर आर्थिकदृष्टया तरी आपली पत्नी निराधार होणार नाही, याची दक्षता घेतली आहे.

पित्याच्या मृत्यूनंतर जेव्हा पुत्र वाटप करू लागतात तेव्हा भागिदाराच्या मिळकतीत मातेलादेखील पुत्राच्या इतका हिस्सा मिळण्याचा अधिकार असतो. हे सांगत असता याज्ञवल्क्यस्मृती म्हणते -

"पितरूर्ध्वं विभजतां माताप्यंशं समं हरेत्।"[4]

अपरार्क टीकेत "मातेला" म्हणजे सापत्न मातेलाही पुत्राइतका समान अंश मिळतो, असे म्हटले आहे. मिताक्षरासारात स्त्रीधन दिलेले नसले तरच समान अंश मिळतो व ते दिलेले असल्यास तिला अर्धा भाग मिळतो असे सांगितले आहे.

याज्ञवल्क्यस्मृतीने प्रस्तुत नियमाद्वारे वैधव्यावस्थेमध्ये स्त्रीला आर्थिकदृष्टया आधार प्राप्त करून दिला आहे. अपरार्कांने तर आणखी पुढे जाऊन सावत्र आईची देखील संपत्तीमध्ये वाटणी सांगितली आहे. त्यादृष्टीने त्यांचे मत उल्लेखनीय आहे. कोणत्या ना कोणत्या तरी रूपाने स्त्रीजवळ पतीच्या पश्चात संपत्तीची आवश्यकता विज्ञानेश्वराने प्रतिपादन केली आहे.

संपत्तीच्या वारसाक्रमामध्ये पत्नीचे महत्त्वपूर्ण स्थान :-

पितृधनाची विभागणी ही औरस इ. मुख्य त्याचप्रमाणे गौण पुत्रांच्यामध्ये होते. तथापि एखाद्या वेळेस यांच्यापैकी कोणीच नसल्यास पुत्ररहित पित्याच्या धनाची विभागणी कशी होते, याविषयी त्याच्या वारसांचा क्रम सांगितला आहे. याप्रसंगी याज्ञवल्क्यस्मृती म्हणते-

"पत्नी दुहितरश्चैव पितरौ भ्रातरस्तथा।
तत्सुता गोत्रजा बन्धुः शिष्यः सब्रह्मचारिणः।
एषामभावे पूर्वस्य धनभागुत्तरोत्तर ।
स्वर्यातस्य ह्यपुत्रस्य स्वर्ववर्णेष्वयं विधिः।।[5]

अपुत्र स्वर्गास गेल्यास त्याचे धन घेणारा - पत्नी, दुहितृ आणि पितर,

बंधू, त्याचे पुत्र, गोत्रज बंधू, शिष्य, ब्रह्मचारी या पत्नीदिकांतील पूर्व पूर्व नसल्यास उत्तर उत्तर समजावा· सर्व वर्णांमध्ये हा दायग्रहणक्रम जाणावा·

याज्ञवल्क्याने निपुत्रिक असा मनुष्य मृत झाला असता त्याची पत्नी म्हणजे विधवा ही पहिली वारस असल्याचे सांगितले आहे· याज्ञवल्क्याने स्मृतीमध्ये सांगितलेला हा नियम स्त्रियांच्या दृष्टीने अतिशय उल्लेखनीय आहे· याज्ञवल्क्याने प्रस्तुत ठिकाणी "विवाहाने संस्कृत झालेली पत्नी" असा अर्थ अभिप्रेत असल्याचे मिताक्षरेमध्ये म्हटले आहे· या श्लोकाविषयी स्पष्टीकरण त्यामध्ये दिले आहे·-

"पत्नी" हे एकवचन जातीच्या अभिप्रायाने वापरले आहे· जर एखाद्याला एकापेक्षा अधिक आपल्या जातीच्या §सजातीय§ किंवा दुस-या जातीच्या §विजातीय§ पत्नी अर्थात विधवा हयात असल्यास त्यांनी आपल्या मृत पतीची मिळकत समान रीतीने वाटून घ्यावी असे म्हटले आहे·

मिताक्षरासारामध्ये अपरार्कादि टीकेमध्ये देखील विधवेच्या दायग्रहणसंबंधी विविध स्मृतिकार इ·नी आपली मते मांडली आहेत· प्रस्तुत ठिकाणी त्यांचा उल्लेख करणे आवश्यक वाटते·

वृद्ध मनूने, पत्नीचा समग्रधनसंबंध सांगताना म्हटले आहे- "भर्त्याच्या शय्येचे पालन करीत व्रतस्थ असलेल्या पत्नीनेच त्याला पिंड देऊन सर्व धन घ्यावे·" बृहत्विष्णूने "अपुत्राचे धन पत्नीस प्राप्त होते, तिच्या अभावी ते कन्यागामी, कन्येच्या अभावी पितृगामी व पित्याच्या अभावी मातृगामी होते" असे म्हटले आहे· कात्यायनाने "अव्यभिचारी पत्नी पतीचे धन घेते· तिच्या अभावी अविवाहित कन्या, त्याचप्रमाणे अपुत्राचे धन घेणारी पहिली श्रेष्ठ कुलातील पत्नी, तिच्या मागून कन्या, नंतर क्रमाने पिता, माता, भ्राता व त्याचे पुत्र" असे म्हटले आहे· बृहस्पतीने देखील "पिता, भ्राता इ·सपिंडजन हयात असताना देखील मेलेल्या अपुत्राची पत्नी त्याचे धन घेते" असे सांगितले आहे·

दायग्रहणाच्या बाबतीत विधवेचा अधिकार डावलणारी अशी वेगवेगळी वचने आहेत· तथापि अशाप्रकारच्या सर्व विरुद्ध अर्थाच्या वाक्यांची व्यवस्था योगीश्वरांनी दाखविलेली आहे· "अनेक भ्रात्यांतील एखादा संतानरहित भ्राता जर मृत किंवा संन्यस्त झाला तर स्त्रीधनावाचून त्याचे बाकीचे धन त्याचे इतर भ्राते वाटून घेतात· त्यांनी त्याच्या शुद्ध

भार्येचे पोषण मात्र मरेपर्यंत करावे· पण त्या शूद्र नसल्यास त्यांची वृत्ती बंद करावी·" असे म्हणून नारदाने पत्नी विद्यमान असतानाही भ्रात्यांनी धन घ्यावे, व पत्नीचे नुसते पोषण करावे, असे सांगितले आहे· मनूने "अपुत्राचे धन पित्याने अथवा भ्रात्याने घ्यावे असे सांगितले आहे· त्याचप्रमाणे त्याने माता व पितामही यांच्याही अपुत्राच्या धनाचा संबंध दाखविला आहे· ¥अ·9·217¥· शंखानेही भ्राते, पिता, माता व ज्येष्ठ पत्नी यांच्याकडे क्रमाने धनसंबंध सांगितला आहे· कात्यायनानेही "विभक्त झालेला पुरूष मेल्यास व त्याला पुत्र नसल्यास त्याचे धन पित्याने घ्यावे· तेही नसल्यास क्रमाने भ्राता, पिता व पितामही यांनी ते घ्यावे" असे म्हटले आहे·

निपुत्रिक मृतधनाचा प्रथम अधिकार पत्नीला सांगितला आहे· त्यानंतर पत्नीच्या अभावी कन्येला हा अधिकार दिला आहे· कन्या हे बहुवचन समानजातीच्या व असमान जातीच्या कन्यांना सम व विषम अंश प्राप्त व्हावा, म्हणून योजिले असल्याचे सांगितले आहे· कात्यायनाने अव्यभिचारिणी पत्नी भर्त्याचे धन हरण करणारी आहे असे सांगितले आहे· बृहस्पतीने भर्त्याची धनहरी पत्नी आहे तिच्या अभावी कन्या कारण ती देखील पुत्राप्रमाणेच मानवाच्या प्रत्येक अंगापासून उत्पन्न झालेली असते· तेव्हा ती असताना पित्याचे धन दुसरे कोण घेणार ? असे म्हटले आहे· तथापि मिताक्षरे-मध्ये म्हटले आहे की, "त्यातल्यात्यात विवाहित व अविवाहित अशा दोन्ही प्रकारच्या कन्या असतील तर अविवाहित कन्येनेच पितृधन घ्यावे· विवाहित कन्यांपैकी प्रतिष्ठित म्हणजे श्रीमंत व अप्रतिष्ठित म्हणजे दरिद्री यांचा समवाय असता ज्यात त्या कन्या अप्रतिष्ठित असतील त्यांनी पितृधन घ्यावे· पण सर्व कन्या विवाहित व प्रतिष्ठित असल्यास त्यांनीत ते घ्यावे·" एकंदरीत मिताक्षरेने विवाहित कन्यांपैकी दारिद्र्यात अथवा असहाय्य स्थितीत असलेल्या कन्येला पितृधनात अग्रहक्क द्यावे असे म्हटले आहे· आणि ही वाटणी उचित आहे· जिला अधिक गरज आहे तिने पित्याचे धन घेणे केव्हाही योग्य ठरेल·

2·135 श्लोकामध्ये "दुहितरश्चैव" असे म्हटले आहे· यातील च शब्दाने दुहिता म्हणजे "कन्या नसल्यास कन्यापुत्राला संपत्तीमध्ये वाटणी मिळते" असे म्हटले आहे·[6] विष्णू व मनू या दोघांनीही पुत्रपौत्रसंतान दौहित्रच म्हणजे कन्यासुत· पौत्र म्हणजे पुत्राचे पुत्र आहेत असे मानलेले आहे·

कन्या व कन्यापुत्र यांच्या अभावी माता व तिच्या अभावी पिता धनभाक् होतो· "पितरौ" या शब्दाने माता व पिता या दोघांची देखील प्रतीती होत असल्याचे म्हटले आहे· शिवाय पिता दुस-या पुत्रांमध्येही साधारण आहे, पण माता तशी नाही· त्यामुळे विशेष सामीप्यामुळे मातेलाच प्रथम धनांश प्राप्त होणे योग्य आहे· क्रमाने पितरानंतर भ्राते हे मृत अपुत्रिकाच्या संपत्तीचे वारसदार होतात· या भ्रात्यांचाही अभाव असल्यास गोत्रज धनभाक् होतात· मिताक्षरासारात "गोत्रज" म्हणजे पितामही अर्थात वडिलांची आई सपिंड व समानोदक असा अर्थ घेतला आहे· अर्थात यामध्ये पितामही ही प्रथम धनाची वाटेकरी असल्याचे सांगितले आहे·

"विभजेरन्सुताः पित्रोरूर्ध्वं रिक्थमृणं समम्।"

माता व पिता यांच्या मृत्यूनंतर पुत्र रिक्थ व ऋण यांचा समविभाग करू शकतात· अर्थात् माता व पिता ह्यांचे धन पुत्रांनी वाटून घ्यावे, असे श्लोकाच्या पूर्वार्धामध्ये सांगितल्यानंतर उत्तरार्धामध्ये मातृधनाविषयी अपवाद सांगितला आहे·

"मातुर्दुहितरः शेषमृणात्ताभ्य ऋतेऽन्वयः।।"[7]

"मातेने जे ऋण केले असेल ते फेडून बाकीचे राहिलेले धन त्यांनी वाटून घ्यावे कन्या नसल्यास तिच्या पुत्र इ·अन्य संततीने ते घ्यावे·" मिताक्षरासारात यापुढे म्हटले आहे- "जितके ऋण तितकेच किंवा त्यापेक्षा कमी मातृधन असल्यास पुत्रांनी त्याचा विभाग करावा·

मातेने केलेले ऋण पुत्रांनीच फेडावे, कन्यांनी घ्यावे हे योग्य आहे· कारण "पुरूषाचे शुक्र अधिक झाल्यास पुरूष व स्त्रीचे शुक्र अधिक झाल्यास स्त्रीसंतान होते·" असे वचन असल्यामुळे स्त्रीचे अवयव कन्यांमध्ये अधिक असतात· त्यामुळे स्त्रीधन कन्येला प्राप्त होणे योग्य आहे· पित्याचे अवयव पुत्रामध्ये अधिक असल्यामुळे पितृधन पुत्रास प्राप्त होते· त्याविषयी गौतमाने विशेष गोष्ट सांगितली आहे· विवाहविधीने दिलेल्या व न दिलेल्या म्हणजे विवाहित आणि कुमारी अशा दोन्ही प्रकारच्या कन्या असल्यास त्यांच्या आईचे धन विवाह न झालेल्या कन्यांना प्राप्त होते· पण सर्वच विवाहित असल्यास, त्यात ज्या निर्धन असतील त्यांना ते मिळते· तथापि कन्या मुळीच नसल्यास ऋण देऊन मातृधन कोणी घ्यावे असा प्रश्न उपस्थित झाला असता "ताभ्य ऋते अन्वयः"

असे सांगितले आहे. त्या कन्या नसल्यास तिच्या पुत्रादि अन्य संतती ने ते घ्यावे.

एखाद्या भागीदाराची स्त्री गर्भवती असेल तर ती प्रसूत होईपर्यंत वाटप तहकूब ठेवावे असे वसिष्ठाने[8] सांगितले आहे. तथापि तशाही स्थितीत वाटप होते. वाटण्या झाल्यानंतर उत्पन्न होणा-या पुत्राला आई-वडिलांच्या मागे त्यास त्याचा अंश मिळतो. परंतु याचा अपवाद मिताक्षरासारातील या श्लोकाच्या विवेचनप्रसंगी असा सांगितला आहे की, "अविवाहित किंवा दरिद्री कन्या असल्यास त्याच्या आईचा भाग त्याला मिळत नाही" म्हणजे बहीण नसल्यास त्याला हे धन घेता येते, असे या नियमांवरून दिसते. कारण यापूर्वीच्या एकशे सतराव्या श्लोकामध्ये आईच्या द्रव्यावर मुलीचा अधिकार आहे असे सांगितले आहे.

भगिनी :-

वाटणी झाल्यानंतर मागे बहीण वगैरे असेल तर तिच्या विवाह इ.बाबत प्रश्न उपस्थित होतो. अशाप्रसंगी भावाभावांमध्ये वाटप करण्यापूर्वी अविवाहित भगिनीच्या विवाहाची तरतूद केली पाहिजे, या बाबतीत याज्ञवल्क्यस्मृतीने महत्त्वपूर्ण उल्लेख केला आहे. "भगिन्यश्च निजादंशाद्दत्वांशं तु तुरीयकम्।"[9] याचा अर्थ असा- "ज्यांचा संस्कार झालेला नसेल त्या भगिनींचा विवाह संस्कार भ्रात्यांनी आपल्या अंशातील चौथा अंश देऊन करावा."

अपरार्क टीकेत म्हटले आहे "भगिन्यश्चाकृतविवाहसंस्काराएकस्य पुत्रस्य यावान्निजोंऽशस्तस्माच्चतुर्थमंशं प्रत्येकं प्रदाय संस्कार्या विवाहितव्याः।"

शूलपाणीच्या दीपकलिकेतही "स्वाद्दतान् चतुर्थमंशं दत्त्वा तेनैव धनेन विवाहसंस्कारेण संस्कार्याः।" असे म्हटले आहे.

याज्ञवल्क्यस्मृतीने अविवाहित भगिनीच्या विवाहाबाबत भावांनी आर्थिक व्यवस्था करून मग संपत्तीची वाटणी करावी असा महत्त्वपूर्ण नियम केला आहे. त्यामुळे अशा मुलीच्या विवाहविषयक समस्या सुटण्यास निश्चितच मदत झाली आहे.

अपुत्र मृताचे धन पत्नी इ.वारसांचे होते. तथापि त्याचा अपवाद याप्रमाणे सांगितला आहे.-

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

"संसृष्टिनस्तु संसृष्टी सोदरस्य तु सोदरः।
दद्यादपहरेच्चांशं जातस्य च मृतस्य च।।"[10]

"एकदा विभाग केलेले धन पुनः एकत्र मिळविणे याला संसृष्ट धन म्हणतात· ते ज्याच्याजवळ असते तो संसृष्टी· संसृष्टित्वही पाहिजे त्याच्याशी होऊ शकत नाही· तर पिता, भ्राता व पितृव्य यांच्याशीच होते· कारण बृहस्पतीने जो विभक्त झालेला पुरूष पिता, भ्राता अथवा पितृत्व यांच्या प्रेमामुळे पुनः त्याच्याशी एकत्र राहतो तो संसृष्टी होय, असे सांगितले आहे· अशा प्रकारचा संसृष्टी मेला असता व विभागसमयी त्याची भार्या गर्भवती आहे, हे न समजल्यामुळे त्याचा विभाग काढल्याशिवाय वाटणी केल्यावर त्याची भार्या गर्भवती आहे, असे कळून तिला योग्यसमयी पुत्र झाल्यास त्याला इतर भ्रात्यांनी त्याचा विभाग द्यावा· पुत्र नसल्यास मात्र त्यांनीच घ्यावा पत्नीला देऊ नये·

या श्लोकाच्या बाकीच्या तीन पदांमध्ये संसृष्टिनस्तु संसृष्टि या पहिल्या पदाचा अपवाद सांगितला आहे· सोदर संसृष्टी मृत झाल्यास त्याचा अंश सोदर संसृष्टीने संसृष्ट झाल्यावर उत्पन्न झालेल्या त्याच्या पुत्रास द्यावा· पण तो नसल्यास स्वतः हरण करावा· त्याचप्रमाणे सोदर व असोदर यांचा संसर्ग झाला असता सोदर संसृष्टीच होतो· भिन्नोदर भ्राता संसृष्ट असला तरी तो घेत नाही·"[11]

पुत्र, पत्न्यादि संसृष्टांचे जे दायग्रहण सांगितले आहे· त्याचा अपवाद येथे 2·8·140 मध्ये सांगितला आहे· "नपुंसक, पतित, पतितापासून जन्माला आलेला, मत्त, जड, अंध, अचिकित्स्य अशा रोगांनी युक्त इ·सर्व अनंश म्हणजे रिक्थास पात्र नाही असे म्हटले आहे·" मिताक्षरासारात म्हटले आहे, "या श्लोकात सर्व शब्द जर पुल्लिंगी वापरले असले तरी त्याला फारसे महत्त्व न देता पत्नी, कन्या, माता इ·स्त्रिया देखील वरील दोषांनी दूषित असल्यास त्यांनाही अंश मिळत नाही, असे जाणावे·"

तथापि या नपुंसक क्लीब इ·कन्यांविषयी महत्त्वाची बाब सांगत असता म्हटले आहे - "क्लीबादिकांच्या कन्या विवाहाने संस्कृत होईपर्यंत त्या पोषण करण्यास योग्य आहेत, त्यांचा विवाहसंस्कार करणे देखील योग्य आहे·"[12] क्लीब इ·च्या

पत्नीविषयी विशेष सांगितला आहे की, "या अपुत्र स्त्रियांचे त्या सदाचारसंपन्न अर्थात अव्यभिचारी असल्यास भरण करावे· पण त्या व्यभिचारिणी असल्यास त्यांना घरातून घालवून द्यावे त्याचप्रमाणे त्या प्रतिकूल असल्यास त्यांना बाहेर घालवावे·"[13]

वरती वर्णन केलेल्या दोषांसाठी, त्या व्यक्तींचे वाटपासंबंधी आणि वारसा हक्कासंबंधीचे हक्क काढून घेतले जातात· तथापि अशा व्यक्तिंच्या कन्यांना पालनपोषण होण्याचा आणि विवाहाची तरतूद करून घेण्याचा हक्क असतो· नपुंसक इ·च्या स्त्रिया या निर्दोष वर्तनाच्या असतील तर त्या स्त्रियांना पालनपोषणाचा आणि विवाहाची तरतूद करून घेण्याचा हक्क असतो असे याज्ञवल्क्यस्मृतीने प्रतिपादन केले आहे·

**स्त्रीधन :-**

स्त्रियांच्या आर्थिक बाबींचा विचार करीत असताना "स्त्रीधन" याविषयी चर्चा करणे आवश्यक ठरते· "स्त्रीधन म्हणजे एखाद्या स्त्रीची मालमत्ता"[14] किंवा "ज्या मिळकतीवर कोणत्याही वेळी कमीजास्त प्रमाणात अनिर्बंध मालकी हक्क सांगता येतो त्याला स्त्रीधन म्हणतात·"[15] स्त्रीधनाचा विचार करीत असताना त्यामध्ये पुढील तीन बाबींच्या दृष्टीने विचार करणे महत्त्वाचे ठरते· ·1·स्त्रीधनामध्ये समाविष्ट होणा-या वस्तू, ·2·स्त्रीची तिच्या स्त्रीधनावरील सत्ता·, ·3·स्त्रीधनाचा वारसा·

स्त्रीधनाच्या कल्पनेचे मूळ वैदिक वाङ्मयात आढळते· यातील उल्लेखांवरून प्राचीन काळी स्त्रियांच्या मालकीची म्हणून जी मिळकत समजली जात असे· तिच्यामध्ये विवाहप्रसंगी त्यांना देण्यात आलेल्या अलंकार, मौल्यवान कापड यांच्यासारख्या देणग्या आणि सामान्यतः स्त्रियांच्या ताब्यात असणारे घरातील जिन्नस अशाच वस्तूंचा समावेश होत असे तथापि या स्त्रीधनाची निश्चित व्याप्ती किती असावी· याचा वैदिक वाङ्मयात कुठेच उल्लेख आढळत नाही· मनूने प्रथम त्याची व्याप्ती मनुस्मृतीमध्ये[16] सांगितली आहे· तो म्हणतो, "अध्यग्न्यध्यावहनिकं दत्तं च प्रीतिकर्मणि। भ्रातृमातृपितृप्राप्तं षड्विधं स्त्रीधनं स्मृतम्।" याचा अर्थ असा "एखाद्या स्त्रीला जे जे विवाहाग्निसमीप दिले असेल, वरातीच्या वेळी दिले असेल, प्रेमाचे चिह्न म्हणून दिले असेल आणि तिला जे तिच्या भ्रात्याकडून, मातेकडून अथवा पित्याकडून प्राप्त झाले असेल त्यांना सहा प्रकारचे स्त्रीधन म्हणतात·"

<u>स्त्रीधनामध्ये अंतर्भूत होणा-या वस्तू</u> :-

याज्ञवल्क्यस्मृती म्हणते -

"पितृ-मातृ-पति-भातृ-दत्तमध्यग्न्युपागतम्।
अधिवेदनिकाद्यं च स्त्रीधनं परिकीर्तितम्।।"[17]
बन्धुदत्तं तथा शुल्कमन्वाधेयकमेव च।"

पिता, माता, पती व भ्राता यांनी दिलेले विवाहसमयी अग्नीच्या समीप मातुल इ॰नी दिलेले, अधिवेदनानिमित्त प्राप्त झालेले इ॰§इत्यादी शब्दामध्ये रिक्थ, क्रय, संविभाग, परिग्रह, अधिगम यांच्यायोगे प्राप्त यांचा समावेश केला आहे॰§, बंधुदत्त §कन्येच्या भ्रातृबंधूंनी किंवा पितृबंधूंनी दिलेले§, शुल्कअन्वाधेयक §कन्येच्या मातृबंधूंनी अथवा पितृबंधूंनी जे परत दिलेले शुल्क, की जे घेऊन कन्या दिली जाते त्याला अन्वाध्येयक असे म्हणतात॰§

स्मृतिकारांपैकी कात्यायनाने याबाबत सर्वात विस्तृत विवेचन केले आहे आणि त्याने दिलेल्या व्याख्या दायभागासहित सर्व निबंधकारांनी मान्य केल्या आहेत॰ कात्यायन म्हणतो-

"विवाहकाले यत्स्त्रीभ्यो दीयते ह्यग्निसंनिधौ।
तदध्यग्निकृतं सभ्दिः स्त्रीधनं परिकीर्तितम्।।
यत्पुनर्लभते नारी नीयमाना पितुर्गृहात्।
अध्यावहनिकं नाम स्त्रीधनं परिकीर्तितम्।।
पीत्या दत्तं तु यत्किंचिच्छ्वश्रवा वा श्वशुरेण वा।
पादवन्दनिकं तत्तु लावण्यार्जितमुच्यते।।
उढायाः कन्यकाया वा पत्युः पितृगृहेऽपि वा।
भ्रातुः सकाशात्पित्रोर्वा लब्धं सौदायिकं स्मृतम्।।"

याचा अर्थ असा- "विवाहसमयी स्त्रियांना अग्निसंनिध जे दिले जाते त्याला अध्याग्निकृत म्हणतात॰ पित्याच्या घरातून सासरी नेत असताना स्त्रियांना जे धन मिळते ते अध्यावहनिक स्त्रीधन होय॰ सासू किंवा श्वशुर यांनी प्रेमाने किंवा पादवंदनसमयी दिलेले जे धन ते प्रीतिदत्त होय॰ विवाहित कन्येला पतीपासून किंवा पित्याच्या येथेही

भ्राता, आई-वडील इ·पासून जे मिळालेले असते ते सौदायिक सांगितले आहे·"

स्त्रीधनाचा अर्थ स्त्रीची मिळकत असा असला तरी स्मृतिग्रंथानी हा शब्द एखाद्या स्त्रीला एखाद्या विशिष्ट प्रसंगी अथवा तिच्या आयुष्यातील निरनिराळ्या प्रसंगी द्यावयाच्या काही विशिष्ट प्रकारच्या मिळकतींनाच फक्त लावलेला दिसतो·

मिताक्षरासारात[18] म्हटले आहे येथील "स्त्रीधन" हा शब्द यौगिक आहे· पारिभाषिक नव्हे·

डॉ·म·म·काणे म्हणतात[19], स्त्रीधनात कोणत्या वस्तूंचा समावेश होतो ह्या विषयीच्या स्मृतिग्रंथातील वचनांवरून असा निष्कर्ष निघतो की, स्त्रीधन ही एक पारिभाषिक संज्ञा असून तिच्यात प्रारंभी फक्त सहा प्रकारच्या संपत्तीचा अंतर्भाव होत परंतु क्रमाक्रमाने कात्यायनाने दिलेल्या व्याख्येप्रमाणे त्या संज्ञेत एखाद्या स्त्रीला अविवाहित अविवाहित अथवा विवाहित स्थितीत तिच्या माता-पित्यांकडून नातेवाइकांकडून अथवा पतीकडून किंवा पतीच्या कुटुंबाकडून मिळालेल्या सर्व (पतीने दिलेल्या स्थावर मिळकतीखेरीज इतर) संपत्तीचा अंतर्भाव होऊ लागला· परंतु एखाद्या स्त्रीला विवाहानंतर तिच्या स्वतःच्या परिश्रमाने, कलाकौशल्यामुळे अथवा इतरांकडून प्राप्त होणारे धन हे स्त्रीधन होत नाही असे मानले मानले जात असे· स्मृतींनी स्त्रीधनाची पूर्णव्यापक अशी व्याख्या दिलेली नसून फक्त काही विशिष्ट प्रकारच्या मिळकतींचीच नांवे दिली आहेत·

टीकाकारांनी आणि निबंधग्रंथकारांनी केलेल्या स्त्रीधनाच्या व्याख्यांना व्यावहारिक दृष्टीने अतिशय महत्त्व असते· कारण न्यायालयात प्रत्येक परंपरेतील अधिकृत मानलेल्या टीकाकारांच्या मताला अनुसरून निर्णय करण्यात येतो आणि अशा अधिकृत टीकाकारांच्या मतांशी विरूद्ध असणारा असा आपल्या स्वतःचा अर्थ करण्याचे स्वातंत्र्य न्यायाधीशांना असत नाही·

मुंबई प्रांतातील न्यायालयातील निर्णयांवरून असे दिसून येते की, एखाद्या स्त्रीला तिचा जन्म ज्या कुटुंबात झाला त्या कुटुंबातील पुरूषांकडून वारसा हक्काने प्राप्त झालेली मिळकत अथवा दुस-या स्त्रीकडून वारसा हक्काने प्राप्त झालेली मिळकत त्या स्त्रीचे स्त्रीधन होते·

**स्त्रीधनाचा वारसा :-**

याज्ञवल्क्याने स्त्रीधनाचे स्वरूप सांगितल्यावर त्याच्या वारसासंबंधी किंवा विभागणीसंबंधी सांगितले आहे.-

"अप्रजस्त्रीधनं भर्तृर्ब्राह्मादिषु चतुर्ष्वपि ।
दुहितॄणां प्रसूता चेच्छेषेषु पितृगामी तत्।"[20]

ब्राह्म इ.चार मान्य प्रकारचा विवाह असेल तर अपत्यहीन स्त्रीचे स्त्रीधन पतीकडे जाते. अपत्यवतीचे धन दुहितृचे होते आणि बाकीच्या चार प्रकारचा विवाह असेल तर ते पितृगामी होते.

मिताक्षरासारामध्ये या श्लोकाविषयी पुढीलप्रमाणे अर्थ व स्पष्टीकरण आले आहे - "ब्राह्म, दैव, आर्य व प्राजापत्य या चार प्रकारच्या विवाहातील कोणत्यातरी एकाने भार्यत्वास प्राप्त झालेल्या व अपत्यावाचून मरण पावलेल्या स्त्रीचे धन प्रथम भर्त्याचे होते. त्याच्याअभावी त्याच्याच अधिक जवळच्या सपिंडाचे होते आणि बाकीच्या म्हणजे आसुर, गंधर्व, राक्षस व पैशाच या चार विवाहात भार्या झालेल्या अपत्यरहित स्त्रीचे धन प्रथम मातेला आणि नंतर पित्याला प्राप्त होते. ती दोन्ही नसल्यास त्यांच्या जवळच्या सपिंडास ते मिळते पण या सर्व विवाहामध्ये तिला अपत्य झालेले असल्यास तिचे धन कन्येच्या कन्येला मिळते. श्लोकातील "दुहितॄणां" या शब्दाचा अर्थ नातीला असाच करणे योग्य आहे. कारण प्रत्यक्ष कन्येला मिळते, हे तर "मातुर्दुहितरः शेषं" यातून सांगितले आहेच. त्यामुळे आई मृत झाली असता मातेचे धन प्रथम कन्या घेतात. त्यातील काही विवाहित व काही अविवाहित असल्यास अविवाहित कन्या घेतात. त्यांच्या अभावी विवाहित देखील घेतात. यामध्ये देखील निर्धन कन्या अगोदर धन ग्रहण करण्यास पात्र आहेत. निर्धन कन्याच नसल्यास सधनांनी ते घ्यावे. पण हे सर्व शुल्कावाचून बोलणे आहे. कारण "भगिनी शुल्कं सोदर्याणामूर्ध्वं मातुः" असे गौतम वचन असल्यामुळे ते सोदर भ्रात्यांचेच होते. तथापि वर सांगितलेल्या कन्यांचा अभाव असल्यास कन्यांच्या कन्या ते घेतात. पण त्या म्हणजे नाती भिन्न-भिन्न मातांच्या मुली असल्यास व सगळ्या सारख्या नसल्यास मातेच्या द्वारा त्यांचे विभाग करावे. कारण गौतमाने असे सांगितले आहे. पण काही कन्याही असून शिवाय काही कन्यांच्या कन्याही

असल्यास कन्यांच्या कन्यांना काही थोडेसे द्यावे· कारण मनूने तसे सांगितले आहे·

कन्यांच्या कन्याही नसल्यास कन्यांचे पुत्र धनग्राहक होतात· नारदाने "दुहितृणां तदन्वयः" असे म्हणून तत् या शब्दाने जवळच्या दुहितृ पदाचा परामर्श केला आहे· दैहित्रांच्या अभावी पुत्र धनग्रहण करतात· कारण "ताभ्य ऋतेअन्वयः" असे म्हटले आहे· मनूनेही "जनन्या संस्थितार्यां तुः" या वचनाने दुहिता व पुत्र यांचा मातृधनाशी संबंध दाखविला आहे· मातृक रिक्थ सर्व सहोदरांनी व सर्व भगिनींनी सारखे वाटून घ्यावे, असा त्याचा सारांश निघतो· सोदर व सम या शब्दांनी असमानोदर व विषय यांची निवृत्ती केली आहे· पण जिला अपत्य नाही, अशा हीन जातीच्या स्त्रीचे धन भिन्नोदरात झालेली ही उत्तम जातीच्या सपत्नीची कन्या घेते· तिच्या अभावी तिचे अपत्य ते धन घेऊ शकते· कारण मनूने[21] "स्त्रियास्तुयभ्दवेत्" यामध्ये पित्याने दिलेले स्त्रीधन ब्राह्मणी कन्येने अथवा तिच्या पुत्राने हरण करावे, असे म्हणून उत्तम जातीच्या सवतीच्या संततीने ते घ्यावे· असे सुचविले आहे· वास्तव अपत्यरहित वैश्या स्त्रीचे धन क्षत्रिया कन्या घेऊ शकते पुत्राच्या अभावी पौत्र पितामहीचे धन हरण करतात· "पुत्रपौत्रैर्ऋणं देयं" असे म्हणून पौत्रांनाही पितामहीचे ऋण फेडण्याचा अधिकार आहे· असे सांगितले आहे आणि पौत्रांचाही अभाव असल्यास पूर्वोक्त भ्राता इ·बांधव स्त्रीधन घेतात·"

शूलपाणीच्या दीपकलिकेमध्ये म्हटले आहे "ब्राह्म इ·द्वारे विवाहित अपत्यरहित स्त्रीचे स्त्रीधन पतिगामी होते, जर ती प्रसूत होऊन कन्या झाली तर कन्येचे होते, आसुर इ·द्वारे विवाहित अपत्यरहित स्त्रीचे स्त्रीधन मातृपितृगामी होते·"

बालक्रीडेमध्येही " ब्राह्मादिषुविवाहचतुष्टये यत् स्त्रीधनं तद प्रसूतयां भर्तुः। प्रसूता चेद दुहितृणामेव" असेच म्हटले आहे·

वाग्दत कन्येविषयी[22] याज्ञवल्क्य म्हणतो-

"दत्वा कन्यां हरन्दण्डयो व्ययं दद्याच्च सोदयम्।
मृतायां दत्तमादद्यात्परिशोध्योभयव्ययम्।।"

मिताक्षरासारामध्ये याविषयी असे म्हटले आहे- "कन्येला वाणी देऊन पुनः परत घेणारा द्रव्यादि व्ययाच्या अनुरोधाने राजाच्या दंडास पात्र होतो· पण परत घेण्याचे विशेष कारण नसताना तिला परत घेतल्यास हे समजावे· कारण विशेष

कारण असल्यास व उत्तम वर आल्यास वाचादत्त कन्येलाही परत घेण्याची अनुज्ञा शास्त्राने दिली आहे, पण वाग्दानाच्या निमित्ताने वराने आपल्यासंबंधी जनांच्या अथवा कन्येच्या संबंधीच्या उपचारार्थ जे धन खर्च केले असेल ते सर्व वृद्धीसह म्हणजे सव्याज कन्यादात्याने वरास द्यावे. पण वाग्दान कन्या संस्कार होण्यापूर्वी मृत झाली असता- पूर्वी वराने अंगठी किंवा शुल्क इ.जे काही दिले असेल ते त्याने आपला व कन्यादात्याचा झालेला खर्च बाद करून बाकी राहिलेले धन घ्यावे. कन्येला मातामहादिकांनी जे दिले असेल अथवा कुलक्रमाने प्राप्त झाले असेल ते शिरोभूषणादि तिच्या पश्चात् तिच्या सोदर भ्रात्यांनी वाटून घ्यावे. कारण बौधायनाचे तसे वचन आहे."

या वरील सर्व चर्चेवरून खालील गोष्टी आपल्या ध्यानात येतात - मिताक्षरेच्या मताप्रमाणे[23] स्त्रीधनाच्या वारसांचे दोन प्रकारचे क्रम सांगितले आहेत. शुल्काचा वारसा स्त्रीच्या सहोदर भ्रात्याकडे आणि त्याच्या अभावी मातेकडे जातो. कुमारिकेचे स्त्रीधन प्रथमतः सहोदर भ्राता, नंतर माता, पिता, निकट, सपिंड यांच्याकडे जाते. कुमारिकेचा विवाह ठरला असून वराकडून शुल्क अथवा इतर देणग्या मिळाल्या असतील तर त्यातून खर्च वजा करून बाकीची संपत्ती वराला परत मिळते.

इतर सर्व प्रकारच्या म्हणजे शुल्क आणि कुमारिकेचे स्त्रीधन यांच्या व्यतिरिक्त असणा-या स्त्रीधनाचा वारसा मिताक्षरेच्या मतानुसार अविवाहित कन्या, दरिद्री किंवा विपन्न विवाहित कन्या, कन्यांच्या कन्या, कन्येचा पुत्र, पुत्र, पुत्राचे पुत्र आणि मान्यप्रकारचा विवाह असल्यास पती, पतीचे सपिंड माता, पिता, पित्याचे सपिंड आणि राजा या क्रमाने प्राप्त होतो.

## स्त्री धनावरील सत्ता :-

स्त्री धनाची चर्चा करीत असता "स्त्रीधनावरील सत्ता" हा मुद्दा पाहावा लागतो. यापूर्वी स्त्रीधनाच्या वारसा संबंधीचे विचार घेतले आहेत. पतीला आपल्या पत्नीच्या स्त्रीधनाचा उपयोग काही विशिष्ट अडचणीच्या वेळी करता येतो आणि तशा परिस्थितीत ते परत करण्याची जबाबदारी त्याच्यावर नसते. हे सांगत असता याज्ञवल्क्य म्हणतो-

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

"दुर्भिक्षे, धर्मकार्ये च व्याधौ संप्रतिरोधके।
गृहीतं स्त्रीधनं भर्ता न स्त्रियै दातुमर्हति।।"[24]

दुर्भिक्ष म्हणजे दुष्काळ, धर्मकार्य, व्याधी, कैद करून नेणे, निग्रह {दंड} याप्रसंगी भर्त्याने स्त्रीधन घेतल्यास ते त्याने परत देण्याची आवश्यकता नाही.

या बाबतीत मिताक्षरासारात म्हटले आहे "दुष्काळप्रसंगी, कुटुंबपोषणार्थ, अवश्य कर्तव्य धर्मकार्यात, व्याधी उत्पन्न झाली असता व कैद करून नेणे, निग्रह म्हणजे दंड करणे, या प्रसंगी ज्याच्याजवळ दुसरे धन नाही, अशा भर्त्याने स्त्रीचे धन घेतल्यास ते त्याने परत देण्याची आवश्यकता नाही. त्याने ते निराळ्या प्रकाराने तिला पाहिजे तर द्यावे. जिवंत स्त्रीचे धन भर्त्याशिवाय दुस-या कोणत्याही दायादाने घेऊ नये कारण ते हरण करणा-या बांधवांना राजाने दंड करावा असे मनूस्मृतीत सांगितले आहे. त्याचप्रमाणे पती जिवंत असताना स्त्रीने धारण केलेला अलंकार वाटणीच्या वेळी वाटून घेऊ नये, घेतल्यास ते पतीत होतात असेही मनुस्मृती सांगितले आहे. त्याचप्रमाणे पती जिवंत असताना स्त्रीने धारण केलेला अलंकार वाटणीच्या वेळी वाटून घेऊ नये. घेतल्यास ते पतीत होतात असेही मनुस्मृतीत[25] सांगितले आहे."

एकंदरीत यावरून असे दिसते की, अत्यावश्यक संकटप्रसंगी पतीला दुस-या कोणत्याही प्रकारे आर्थिक इ.बाबतीत आधारच नसेल, किंवा स्त्रीधन घेतल्याशिवाय गत्यंतरच नसेल त्या प्रसंगी याज्ञवल्क्याने पतीला असे स्त्रीधन घेण्याचा व परत न देण्याचा मार्ग सांगितला आहे. म्हणजेच या परिस्थिती व्यतिरिक्त अन्य परिस्थितीत पतीने स्त्रीधन घेतले तर ते परत करण्याची जबाबदारी पतीवर टाकलेली आहे. पतीशिवाय इतर नातलगांनी एखाद्या स्त्रीच्या धनाचा उपयोग केला तर ती चोरी होते असे मनूने देखील म्हटले आहे.

म.म.काणे म्हणतात की, "हे नियम आजमितीला देखील सर्व परंपरात अधिकृत मानले जातात."

अपरार्कादि टीकेमध्ये कात्यायन स्त्रीधनावरील सत्तेबाबत म्हणतो की, एखाद्या स्त्रीच्या स्त्रीधनाचा उपभोग घेण्याचा अथवा ते दुस-या कोणत्याही प्रकाराने दुस-याला देण्याचा अधिकार तिच्या पतीला अथवा पुत्राला अथवा तिच्या पित्याला अथवा भ्रात्याला

असत नाही· हिंदू स्त्रीला अविवाहित अवस्थेत तिच्या सर्व प्रकारच्या स्त्रीधनाचा आपल्या इच्छेप्रमाणे विनियोग करता येतो· वैधव्यावस्थेमध्ये तिला तिच्या सर्व प्रकारच्या स्त्रीधनाचा आपल्या इच्छेप्रमाणे विनियोग करता येतो आणि तिच्या पतीने दिलेल्या जंगम मिळकतीचा सुद्धा तिला स्वेच्छेप्रमाणे विनियोग करण्याचा अधिकार तिला नसतो आणि विवाहित स्त्रीला पती जिवंत असेपर्यंत फक्त सौदायिक म्हणजे पतीखेरीज अन्य नातेवाईकांनी दिलेल्या देणग्यांच्या स्वरूपाच्या मिळकतीचा विनियोग स्वेच्छेप्रमाणे करता येत नाही· म·म·काणे म्हणतात[26] "आधुनिक काळात न्यायालयात झालेल्या निर्णयात सौदायिक मिळकत आणि सौदायिक व्यतिरिक्त मिळकत ह्यात भेदभाव कायम राखण्यात आला आहे· परंतु सौदायिक मिळकतीत नातलगांनी दिलेली आणि पतीने दिलेली असा भेद राखण्यात आलेला नाही· जर एखाद्या स्त्रीचे स्त्रीधन ज्याला सौदायिक म्हणतात, त्या प्रकारचे असेल तर तिला स्त्रीधनाचा विनियोग विक्री करून, दान देऊन अथवा व्यवस्थापत्राने, आपल्या इच्छेप्रमाणे आणि पतीच्या संमतीशिवाय करता येतो, परंतु इतर प्रकारच्या स्त्रीधनाचा विनियोग पतीच्या संमतीशिवाय तिला करता येत नाही·"

<u>अधिविन्ना: स्त्रीधन</u> :-

जी एक पत्नी असताना दुसरी केली जाते ती अधिविन्ना. अशा स्त्रीचे स्त्रीधन कोणते या बाबतीत याज्ञवल्क्य म्हणतो,-

"अधिविन्नस्त्रियै दद्यादाधिवेदनिकं समम्।
न दत्तं स्त्रीधनं यस्यै दत्ते त्वर्द्धं प्रकीर्तितम्।।"[27]

"भार्येला अधिवेदननिमित्तक समधन द्यावे· सम म्हणजे अधिवेदनाला खर्च केले असेल तितके पण तिला श्वशुराने अथवा स्वतः पतीने स्त्रीधन दिले नसल्यास तितके द्यावे आणि पूर्वीच काही स्त्रीधन दिलेले असल्यास अधिवेदनास जितका खर्च लागला असेल त्याच्या अर्धे द्यावे· पण येथील "अर्ध"शब्द बरोबर निम्मे या अर्थी नाही· म्हणून पूर्वी दिलेले स्त्रीधन व अधिवेदनास झालेला खर्च यात जेवढे अंतर असेल तेवढे द्यावे·"[28]

एक पत्नी हयात असताना दुसरा विवाह केल्यास प्रथम पत्नीला अधिवेदनाबद्दल म्हणजे दुसरा विवाह केल्यामुळे स्त्रीला धन द्यावे, असे याज्ञवल्क्याने या नियमामध्ये सांगितलेले आहे· हल्ली पत्नीच्या भरणपोषणासाठी देऊ केलेल्या या रकमेला "पोटगी"

असे म्हटले जाते· घटस्फोटित पत्नीला ही दिली जाते· तथापि याज्ञवल्क्याने यापूर्वी विवाहप्रकरणामध्ये, विशिष्ट कारणाशिवाय अधिवेदन केल्यास तिने पूर्वीप्रमाणे अन्न, वस्त्र, इ·च्या योगे पोषण करावे असे सांगितले आहे·[29] म्हणजेच अधिवेदन केल्यानंतर देखील याज्ञवल्क्याने पुरुषावर प्रथम पत्नीची जबाबदारी सोपविलेली दिसते· दुसरा विवाह केल्याने तिची जबाबदारी तो पुरुष टाळू शकत नाही·

आधुनिक काळात द्विभार्याप्रतिबंधक कायदा असल्याने अधिवेदनासारखा प्रश्न उद्‌भवत नाही आणि कारणास्तव दुसरा विवाह केला तर प्रथम पत्नीला घटस्फोट देऊन पतीने तिला पोटगी द्यावी अशी व्यवस्था कायद्याने केली आहे·

स्त्रीला धनाचा अधिकार नाही असे म्हणणारी काही धर्मशास्त्रे आहेत, त्याचप्रमाणे तिला हा अधिकार आहे असेही काही धर्मशास्त्रांनी म्हटले आहे· जैमिनीसारख्या मोठया शास्त्रकारांनी स्त्रीधनाची संकल्पना उचलून धरली आहे· याज्ञवल्क्याने देखील या मताचा पुरस्कार केला आहे· डॉ·आंबेडकर किंवा डॉ·आ·ह·साळुंखे यांच्या सारख्या विचारवंतानी याबाबत आपले विचार मांडले आहेत· त्यांचा प्रस्तुत ठिकाणी उल्लेख करणे आवश्यक वाटते·

डॉ·आ·ह·साळुंखे म्हणतात "जैमिनीसारख्या प्रतिष्ठित शास्त्रकारांनी स्त्रीचा धनावरील हक्क मान्य केला आणि इतर शास्त्रकारांनी संकल्पना उचलून धरली हे खरे असले तरी त्यामुळे स्त्रीला धनावर फार मोठा वा पुरुषाशी समान असा अधिकार मिळाला असे मात्र होत नाही· प्रत्यक्षात स्त्रीचा धनावरील अधिकार जुजबीचा होता· डॉ·आळतेकर याबाबतीत म्हणतात ते योग्यच आहे·" "The theory of joint ownership helped the wife only in securing a number of minor rights and privileges...... The joint ownership of the husband and the wife thus practically remained a legal faction. In effect the husband was the sole owner of the family property and the wife had no legal remedy, if he proceeded to squander it and defeat her right to a maintenance or share.'

स्त्रीला जो काही अधिकार होता, त्यावर मर्यादा होत्या· भांडीकुंडी, दागदागिने व उदरनिर्वाह एवढयापुरता तिचा धनाधिकार मर्यादित होता, असे स्थूलमानाने म्हणता येईल·"

एकंदरीत पाहता, स्त्रीधन ही आपल्या हिंदू संस्कृतीमध्ये स्त्रीच्या दृष्टीने एक अभिमानास्पद बाब असल्याचे दिसते· वरील विचारवंताचे मत मान्य करून स्त्रीधनावर मर्यादा होत्या असे मानले तरी देखील, एका विशिष्ट प्रसंगी, स्त्रीच्या संकटकाळी, आर्थिकदृष्टया कमकुवत असलेल्या स्त्रीला "आपले" म्हणता येईल असे स्त्रीधन मोठाच आधार ठरू शकणारे होते आणि आहे· अशाप्रकारची जाणीव याज्ञवल्क्यानेही ठेवून स्त्रीधनाचा अधिकारा तिला दिला ही गोष्ट उल्लेखनीय आहे· ही स्त्रीधनाची परंपरा कायम चालू राहणे आवश्यक आहे, असे वाटते·

**सारांश :-**

याज्ञवल्क्यस्मृतीने स्त्रियांचा संपत्तीतील वारसा, स्त्रीधन इत्यादी अधिकाराबाबत काही महत्त्वाच्या बाबी मांडल्या आहेत· मिताक्षरा प्रमाण मानणा-या व तद्नुसार न्याय देणा-या राज्यात यातील काही नियम, स्त्रियांच्या दृष्टीने हितकारक ठरले आहेत·

दायविभाग या मुद्याची चर्चा चालू असता पत्नी, माता, कन्या, भगिनी, गर्भवती स्त्रीच्या संततीचा देखील विचार याज्ञवल्क्यस्मृतीने करून त्या बाबतीत महत्त्वपूर्ण असे नियम मांडले आहेत·

1· पतीने आपल्या हयातीत संपत्तीची विभागणी केली असता, पुत्राच्या समान हिस्सा पत्नीला द्यावा, असा नियम सांगितल्याने पतीच्या पश्चात पत्नीला आर्थिकदृष्टया आधार प्राप्त झाला आहे·

2· पित्याच्या मृत्यूनंतर पुत्रांच्या संपत्ती विभागणी प्रसंगी मातेला पुत्राच्या इतका हिस्सा मिळतो· अपरार्काने सापत्न मातेलाही हा हिस्सा मिळतो, असे म्हटले आहे· या नियमाने वैधव्यवस्थेतील स्त्रीची आर्थिक निकड भागू शकणार आहे·

3· पुत्ररहित पित्याच्या धनाची विभागणी करीत असता वारसांचा क्रम याज्ञवल्क्यस्मृतीने सांगितला आहे· त्यामध्ये पत्नीला प्रथम नंतर दुहितृ इ·चा वारसाक्रम सांगितला आहे· विधवेचा देखील विचार करणा-या या स्मृतीने अशा

स्त्रीला खरोखर उपकृत केले आहे असे वाटते·

4· धनाची विभागणी झाल्यानंतर मागे बहीण वगैरे असेल तर तिच्या विवाहाची तरतूद भावंडांनी आपल्या अंशातील चौथा अंश देऊन करावी असाही नियम याज्ञवल्क्यस्मृतीने मांडून अविवाहित कन्येच्या जीवनाचा विचार केलेला दिसतो·

5· नपुंसक, क्लीबत्व असलेल्या व्यक्तींचे वाटपासंबंधी आणि वारसा हक्कासंबंधी हक्क काढून घेतले तरी अशा व्यक्तींच्या कन्यांना पोषणाचा, विवाहाची तरतूद करून घेण्याचा हक्क असल्याचे, त्याचप्रमाणे निर्दोष वर्तनाच्या स्त्रियांच्या पालनपोषणा संबंधीचे प्रतिपादन याज्ञवल्क्यस्मृतीने केले आहे·

6· स्त्री-धनाविषयी सांगत असता त्यामध्ये अंतर्भूत होणा-या वस्तू, स्त्रीधनाचा वारसा, स्त्रीधनावरील सत्ता या तीन मुद्यांची चर्चा केली आहे·

7· स्त्रीधनाचा वरसा या संबंधी चर्चा करीत असता ब्राह्म इ·चार मान्य प्रकारचा विवाह असेल तर अपत्यहीन स्त्रीचे धन पतीकडे जाते, तर अपत्यवतीचे धन दुहितृचे होते· इतर चार प्रकारचा विवाह असेल तर ते धन पितृगामी होते, असे म्हटले आहे·

8· पतीला आपल्या पत्नीच्या स्त्रीधनाचा उपयोग काही विशिष्ट अडचणीच्या वेळी करता येतो, तशा स्थितीत ते धन परत करण्याची जबाबदारी त्याच्यावर नसते· या नियमांवरून संकटाव्यतिरिक्त अन्य परिस्थितीत घेतलेले स्त्रीधन परत करण्याची जबाबदारी पतीवर टाकल्याचे लक्षात येते·

9· एक पत्नी हयात असता दुसरा विवाह केल्यास त्याला "अधिवेदन" असे नांव दिले आहे· अधिवेदन केल्यानंतरही प्रथम पत्नीची जबाबदारी न झटकता उलट तिच्या भरणपोषणाची, तिला स्त्रीधनाचा भाग देण्याचा विचार या याज्ञवल्क्यस्मृतीने मांडला आहे· स्त्री संबंधीत अशा प्रकारच्या बाबींचा स्मृती काळामध्ये याज्ञवल्क्याने किती खोल विचार केला होता ते यावरून आपल्या लक्षात येते·

10· स्त्रीधनावर काही मर्यादा होत्या, हे काही विचारवंतांचे म्हणणे मान्य करूनही हिंदू संस्कृतीमधील ही एक अभिमानास्पद बाब असल्याचे दिसते· याज्ञवल्क्यस्मृतीतील स्त्रीधनाच्या कल्पनेने संकटप्रसंगी, आर्थिकदृष्टया दुर्बल

असलेल्या स्त्रीला आधार प्राप्त होत -होता· ही या स्मृतीतील उल्लेखनीय बाब आहे· स्त्रीधनाची ही परंपरा कायम राहणे आवश्यक आहे असे वाटते·

---x--x---x---

संदर्भ :-


1· धर्मकोश व्यवहारकाण्ड पृ·1141

2· या·स्मृ·2·8·114

3· या·स्मृ·2·8·115

4· या·स्मृ·2·8·123

5· या·स्मृ·2·8·135 व 136

6· या·स्मृ·मि·सार 2·8·135

7· या·स्मृ·2·8·117

8· वसिष्ठ स्मृती 17·41

9· या·स्मृ·2·8·124

10· या·स्मृ·2·8·138

11· या·स्मृ·मि·सार 2·8·138

12· या·स्मृ·मि· 2·8·141

13· या·स्मृ· 2·8·142

14· धर्मशास्त्राचा इतिहास सारांशरूप ग्रंथ, (पूर्वार्ध) डॉ·म·म·काणे, अनुवादक - यशवंत भट, पृ·557

15· भा·संस्कृति कोश, खण्ड-10 वा, पृ·200

16· मनुस्मृती 9·194

17· या·स्मृ·2·8·143 व 144

18· या·स्मृ·मि·सार 2·8·143

19· धर्मशास्त्राचा इतिहास, सारांशरूप ग्रंथ, (पूर्वार्ध) डॉ·म·म·काणे, अनुवादक- यशवंत भट, पृ·558·

20· या·स्मृ·2·8·145

21· मनुस्मृती 9·198

22· या·स्मृ·2·8·146

23· याज्ञ·मिताक्षरा, 2·145

24· या·स्मृ·2·8·147

25· मनुस्मृती 8·29

26· धर्मशास्त्राचा इतिहास, सारांशरूप ग्रंथ, (पूर्वार्ध) डॉ·म·म·काणे, अनुवादक - यशवंत भट, पृ·560·

27· या·स्मृ·2·8·148

28· या·स्मृ·मि·सार 2·8·148

29· या·स्मृ·1·3·74

30· हिंदू संस्कृती आणि स्त्री, डॉ·आ·ह·साळुंखे, पृ·117 व 118